राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ee /२०२६ दि. २८/०४/२०२६

"वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, राबोडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक ०१/०५/२०२६ रोजी **तथागत भगवान गौतम बुध्द यांचा २५७०** व्या जयंती महोत्सवनिमित्त अभिवादन कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, ठाणे पश्चिम येथे होणार आहे. सदर कार्यक्रमानिमीत्त **दिनांक ०१/०५/२०२६ रोजी दुपारी १५.०० वा. पासुन ते दिनांक ०२/०५/२०२६ रोजी रात्री २२:००वाजे** पावेतो सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमानिमीत्त मोठया प्रमाणात अनुयायांची तसेच प्रेक्षकांची गर्दी होणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतुक कोंडी होऊन नागरीकांची गैरसोय होवू नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे** हर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

प्रवेश बंद – **१)** कॅडबरी जंक्शन व अल्मेडा चौक कडुन डॉ.आंबेडकर रोडकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खोपट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे.

पर्यायी मार्ग – **अ)** सदरची वाहने ही खोपटकडुन डावे वळण घेवून कोलबाड रोड मार्गे मिनाताई ठाकरे चौक येथुन उजवे वळण घेवुन होलीक्रॉस स्कुल मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) सदरची वाहने ही खोपटकडुन उजवे वळण घेवून चरईकट मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **२)** डॉ.आंबेडकर रोड कडून खोपट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ.आंबेडकर रोड कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येते आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने ही सरळ जावून उथळसर रोड मार्गे उथळसर नाक्या वरून लहान वाहने डावे वळण घेंवून कोलबाड नाका मार्गे व मोठी वाहने मिनाताई ठाकरे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

पार्किंग मनाई – आंबेडकर रोड परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना **दिनांक ०१/०५/२०२६ रोजी दुपारी १५.०० वा. पासुन ते दिनांक ०२/०५/२०२६ रोजी कार्यक्रम संपे पर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/ विशेष शाखा, ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे /नवी मुंबई /बृहन्मुंबई महानगरपालिका.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. राबोडी, नौपाडा, ठाणेनगर वाहतूक उपविभाग ठाणे.